


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १७० ●शुक्रवार, दि. १९ सप्टेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# वांगी येथे बांधावर जाऊन तहसीलदार शेळके यांची पाहणी, शेतकऱ्यांना दिलासा

'गावोगावी, बांधावर जाऊन पंचनामे होणार, कोणीही काळजी करू नये'




**बीड । प्रतिनिधी**

गेल्या पाच - सात दिवसांपासून सतत कोसळणाऱ्या पावसामुळे बीड जिल्ह्यात शेती, पूल व रस्त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी वांगी येथे शेतात जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला तसेच पूरामुळे बाधित झालेल्या पुलाची पाहणी केली. महसूल, कृषी विभागाचे अधिकारी व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. लोकप्रतिनिधींसह प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी गावोगावी जाऊन नुकसानीचा आढावा घेत आहेत. शासनाने तात्काळ पंचनामे करून अहवाल दाखल करण्याचे निर्देश दिलेले आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर व बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तालुकास्तरीय समित्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जनतेला आवाहन केले की, प्रशासन आपल्या सोबत ठामपणे उभे आहे. कोणत्याही शेतकऱ्याला किंवा नागरिकाला एकटे वाटू देणार नाही. नुकसानीच्या पाहणीसाठी प्रशासन सज्ज आहे. जिल्हा प्रशासनाच्या सूचनेनुसार तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अधिनस्त अधिकारी तातडीने पाहणी व पंचनामे करीत आहेत. अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनीही जनतेला आवाहन केले असून ▶▶ उर्वरित पान २ वर

**तालुकानिहाय दैनंदिन पर्जन्यमान अहवाल दि.18.09.2025 स. 10.00 पर्यंत**

| जिल्हा | तालुका | सरासरी (June To Sep) | काल 24 तासात झालेला पाऊस | आजपर्यंत झालेला एकूण पाऊस (June To Sep) | टक्केवारी (June To Sep) | मागील वर्षी आज रोजी पर्यंत झालेला पाऊस | मागील वर्षी आज रोजी पर्यंत झालेल्या पावसाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| बीड | बीड | 594.5 | 19.7 | 705.3 | 118.6 | 699.2 | 117.6 |
| | पाटोदा | 538.7 | 0.8 | 615.6 | 114.3 | 758.8 | 140.9 |
| | आष्टी | 546.1 | 3.1 | 403.6 | 73.9 | 620.3 | 113.6 |
| | गेवराई | 587.0 | 10.7 | 661.2 | 112.6 | 694.4 | 118.3 |
| | माजलगाव | 616.9 | 17.2 | 699.3 | 113.4 | 709.2 | 115.0 |
| | अंबाजोगाई | 632.4 | 1.4 | 716.4 | 113.3 | 744.3 | 117.7 |
| | केज | 583.6 | 7.5 | 628.9 | 107.8 | 669.4 | 114.7 |
| | परळी वै. | 628.1 | - | 559.1 | 89.0 | 721.2 | 114.8 |
| | धारुर | 669.8 | 0.2 | 781.6 | 116.7 | 742.4 | 110.8 |
| | वडवणी | 600.7 | 41.3 | 536.0 | 89.2 | 687.8 | 114.5 |
| | शिरूर का. | 515.6 | 0.5 | 656.5 | 127.3 | 656.9 | 127.4 |
| जिल्हा सरासरी | बीड | 566.1 | 9.6 | 641.6 | 113.3 | 692.5 | 122.3 |

## मराठा समाजाला मोठा दिलासा: हैदराबाद गॅझेटविरोधातील जनहित याचिका हायकोर्टाने फेटाळली, याचिकाकर्त्याला फटकारले



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट संदर्भात काढलेल्या अध्यादेशाला आव्हान देणारी याचिका हायकोर्टात दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर आज सुनावणी पार पडली असून, कोर्टाने ही याचिका फेटाळून लावली आहे. वकील विनीत धोत्रे यांनी ही याचिका दाखल केली होती. याचिकाकर्त्याने जनहित याचिका दाखल केली आहे. पण या याचिकेतील मुद्दे आणि मागणी पाहता व्यापक जनहित दिसत नाही. त्यांना जीआरवर आक्षेप असेल ▶▶ उर्वरित पान २ वर

**• जीआरमुळे कुणाचेही नुकसान नाही : महाधिवक्ता**

त्यानंतर हायकोर्टाने याचिकाकर्त्यांना महत्त्वाचा सवाल केला. या जीआरमुळे याचिकाकर्ते बाधित कसे? असा प्रश्न हायकोर्टाने विचारला. तसेच अशा याचिका दाखल होणे उच्च न्यायालयाला अपेक्षित नाही. आम्ही या याचिकेवर कोणताही विचार करण्यास इच्छुक नाही आणि त्यामुळे ती फेटाळली जात आहे, असे कोर्टाने सांगितले. मात्र, त्याचवेळी, याचिकाकर्त्याला इतर बाधित व्यक्तींनी दाखल केलेल्या याचिकांमध्ये हस्तक्षेप करण्याची मुभाही देण्यात आली आहे. जीआरवर आक्षेप असेल त्यांनी स्वत:ची वैयक्तिक रिट याचिका दाखल करावी, असे कोर्टाने म्हटले आहे.

## एन डी आर एफ देवदूतांच्या मदतकार्यामुळे पूरग्रस्तांमध्ये कृतज्ञ भावना...

**आ.सुरेश धस यांच्या वतीने आभार व्यक्त**



**आष्टी । प्रतिनिधी**

पाथर्डी तालुक्यातील झालेल्या ढगफुटीमुळे कडी नदीला आलेल्या पुरामुळे कडा,टाकळी आमिया, टाकळीसिंग,सांगवी आष्टी या सर्व गावांमध्ये नदी च्या काठी वास्तव्यास असलेल्या नागरिकांना पाण्याने वेढले असताना एनडीआरएफ च्या देवदूतांनी प्राणांची बाजी लावून तालुक्यातील नागरिकांचे प्राण वाचवले आहेत त्याविषयी सर्व पूरग्रस्तांनी कृतज्ञता व्यक्त केली असून आमदार सुरेश धस यांनी या देवदूतांचे आभार मानले रविवारी रात्री सोमवारी पहाटे झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतातील पीके वाहुन गेली शेतजमिनी खरडून गेल्या तसेच अनेक नागरिक पुरामध्ये अडकले. नद्यांची पाण्याची पातळी एवढी वाढली की पूर परिस्थिती निर्माण झाली नदीकाठची लोक पुरा मध्ये अडकली गेली त्यांना वाचवण्यासाठी हेलिकॉप्टर द्वारे एअरलिफ्टिंगच्या पर्यायाशिवाय कोणताही पर्याय नसल्यामुळे आमदार सुरेश धस यांनी बीड जिल्ह्याचे ▶▶ उर्वरित पान २ वर

## बौद्ध महासभेचा आक्रोश मोर्चा

**बीड । प्रतिनिधी**

महाविहार महाबोधी दिक्षाभूमी मुक्तीसाठी बौद्ध महासभेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने अनुयायांची उपस्थिती होती. हा मोर्चा डॉ.बाबासाहे आंबेडकर पुतळ्यापासून काढण्यात आला होता. दिक्षाभूमी मुक्तीठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आज सकाळी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. सदरील या मोर्चाला ▶▶ उर्वरित पान २ वर

## धोकादायक विद्युत रोहित्राला कपड्याने झाकण्याची प्रशासनावर नामुष्की

**सोमवारी 'सेल्फी विथ रोहित्र हॅशटॅग अजितदादा' लक्ष्यवेधी आंदोलन : डॉ.गणेश ढवळे**

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या बीड दौऱ्या दरम्यान नगरनाका ते कृषी कॉलनी मार्गावरील एसबीआय बँकेजवळ असलेल्या धोकादायक विद्युत रोहित्राला कपड्याने झाकून ठेवण्याची नामुष्की जिल्हा प्रशासनावर आली. अनेक वर्षांपासून रस्त्याच्या मधोमध असणारे हे रोहित्र व विजेचे खांब नागरिकांच्या जीवाला धोका ठरत असून अपघातांच्या घटनाही घडलेल्या आहेत. सामाजिक कार्यकर्ते व मुख्य प्रचार प्रमुख, माहिती ▶▶ उर्वरित पान २ वर



## शेतकऱ्यांनी एआय चा उपयोग उत्पादन वाढीसाठी करावा: आमदार प्रकाश सोळंके

**माजलगावात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मेळाव्याने दिली शेतकऱ्यांना नवी दिशा**

**माजलगाव । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी एआय चा उपयोग उत्पादन वाढीसाठी करावा असे मत माजलगाव मतदार संघाचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांनी केले ते लोकनेते सुंदरराव सोळंके यांच्या ९८व्या जयंतीनिमित्त आणि मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना ▶ उर्वरित पान २ वर



## मोठी बातमी! महाराष्ट्रातील 'या' प्रकल्पासाठी शेतकऱ्यांची ७५० एकर जमीन सक्तीने ताब्यात घेतली जाणार

**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांमध्ये महाराष्ट्रात विविध प्रकल्पांची कामे पूर्ण झाली आहेत. मोठमोठी महामार्गांचे कामे पूर्ण करण्यात आली आहेत. नवनवीन रेल्वे मार्ग सुद्धा तयार होत आहेत. अलीकडेच राज्याला एका नव्या रेल्वेमार्गाची भेट मिळाली आहे. नगर ते बीड दरम्यान नुकतीच रेल्वे सेवा सुरू झाली आहे. सोबतच राज्यात नवनवीन विमानतळ सुद्धा तयार केले जात आहेत. पुण्यातही एक भव्य विमानतळ तयार केले जाणार आहे. लोहगाव विमानतळावरील



गर्दी कमी करण्यासाठी पुण्यात नव विमानतळ तयार होत आहे. हे नवविमानतळ पुरंदर तालुक्यात विकसित केले जात असून याच विमानतळ प्रकल्पाबाबत आता एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार हा प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावा यासाठी सरकार कटीबद्ध असून आता या विमानतळासाठी काही कठोर निर्णय घेतले जाणार आहे. शासनाकडून या विमानतळ प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या जमिनीचे भूसंपादन सक्तीने करण्यात येईल अशी माहिती समोर येत आहे. या प्रकल्पासाठी सरकारकडून आकर्षक मोबदला दिला जातोय यामुळे आतापर्यंत २२५० एकर जमिनीचे संपादन पूर्ण झाले आहे. पण आजही असंख्य ▶▶ उर्वरित पान २ वर

## अखेर पडला राहूल गांधींचा हायड्रोजन बॉम्ब! मोबाईलवर OTP आले आणि कॉंग्रेसचे मतदार डिलीट झाले, कशी झाली वोट चोरी

**नवी दिल्ली**

कॉंग्रेस नेते राहूल गांधी यांनी आज दिल्लीतील इंदिरा भवन सभागृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत निवडणूक आयोगावर गंभीर आरोपांचा भडिमार केला. मतदार यादीतून दलित, मागासवर्गीय आणि आदिवासी मतदारांची नावे मुद्दामहून वगळली जात असल्याचा दावा त्यांनी केला. माझ्याकडे १०० टक्के पुरावे आहेत, असा दावा करत त्यांनी निवडणूक आयोग मुख्य आयुक्त चोरांना पाठीशी घालत असल्याचा घणाघाती आरोप केला...

मत चोरीचा 'हायड्रोजन बॉम्ब': राहूल



गांधी यांनी गेल्या काही महिन्यांपासून मत चोरीचा मुद्दा सातत्याने उपस्थित केला आहे. बिहारमधील मतदार जागृती यात्रेच्या समारंभात त्यांनी 'हायड्रोजन बॉम्ब' फोडण्याची घोषणा केली होती. आजच्या पत्रकार परिषदेत त्यांनी हा बॉम्ब नसला तरी पुराव्यांचा भक्कम आधार सादर केला. हा हायड्रोजन बॉम्ब नाही, पण आम्ही सत्य समोर आणत आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले. कर्नाटकातील आळंद मतदारसंघात २०२३ मधील निवडणुकीत ६,०१८ मतदारांची नावे डिलीट करण्यात आली. विशेषतः यात दलित आणि ओबीसी मतदारांचा समावेश आहे. राहूल यांनी सांगितले की, सॉफ्टवेअरच्या माध्यमातून आणि बाहेरील फोन नंबर वापरून मतदार यादीतून ▶▶ उर्वरित पान २ वर

## अनिलदादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत अनेक तरुणांचा शिवसेना ओबीसी व्हीजेएनटी सेनेत प्रवेश



**बीड । प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंदजी दिघे साहेब यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब व संसदरत्न खासदार मा. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या कार्यप्रेरणेने आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील अनेक तरुन कार्यकर्त्यांनी काल दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय बीड येथे शिवसेना ओ.बी.सी-व्ही.जे.एन.टी सेनेत जाहीर प्रवेश केला. हा प्रवेश जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, नवनिर्वाचित तालुकाप्रमुख अशोक दुधाळ व जिल्हा संघटक दगडू गायकवाड यांच्या यांच्या माध्यमातून झाला आहे. प्रवेश घेणाऱ्यांमध्ये विक्रम बिडवे, अशोक पंडित, ▶▶ उर्वरित पान २ वर



# आभाळ फाटलंय... शेतकऱ्यांचे नशिब फुटलंय

सरकारी यंत्रणा बघ्याची भुमिका घेऊन बसलीय...

पाऊस पडो की न पडो ,आमचे पगार चालूच आहेतच की म्हणणं बरोबर नाही बरं

पाऊस पडो की न पडो ,आमचे पगार चालू राहतात.... असे एक वाक्य काही दशकांपूर्वी प्रसिद्ध अर्थतज्ञ वि.म. दांडेकर बोलले होते.

आज अतिवृष्टीने शेतीची जी भयानक स्थिती झाली आहे तेव्हा ते वाक्य आठवले. नोकरी करणाऱ्या व्यक्ती आणि शेतकरी यांची तुलना वि.म.दांडेकर यांनी केली होती. केवळ वेदना समजावून घेण्यासाठी हे रूपक वि. म. दांडेकर यांनी वापरले होते हे लक्षात घ्यायला हवेच ..

उगाचच त्यांनी नोकरदारांवर टीका केली म्हणून गळे काढण्यात अर्थ नाही बरं का ...

जुन्या काळी लोक म्हणतं उत्तम शेती ,मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी अशी मांडणी पूर्वी केली जायची पण आजच्या काळात शेतीची जी दुरावस्था झाली आहे ती अतिशय वेदनादायक आहे. आज वर्तमानपत्रांमध्ये शेतीची मातीच वाहून गेली आणि फक्त खडक, दगड शेतात उरले असे फोटो बघून अक्षरशा वेदना झाल्या त्या फक्त शेतकरी बांधवांना व संवेदनशील व्यक्तिंना. पण सरकारी यंत्रणा आपण काहीच करू शकत नाही ही आपली मर्यादा अधिकच अस्वस्थ करतेय असे वाटते कारण अधिकारी वर्गाने ठरवले तर नक्कीच शेतकऱ्यांना तातडीने



आर्थिक मदत होऊ शकते बरंका

शेतीच्या प्रचंड नुकसानीचे फोटो बघून आणि बातम्यांमधून शेतकऱ्यांचे अश्रू संवेदनशील माणसाचं हृदय पिळवटून टाकतात.जेव्हा दुष्काळ असतो तेव्हा आकाशाकडे बघणारे शेतकरी आणि जेव्हा ओला दुष्काळ असतो. तेव्हा मान खाली घालून पाण्याकडे बघणारा शेतकरी या दोन टोकातून शेतकऱ्याची कधी सुटकाच होणार नाहीच का बरं ....?

दांडेकर म्हणाले होते तसे खाजगी क्षेत्रातील पगार आणि सरकारी क्षेत्रातील पगार हे तुलनेत स्थिर असतात. दांडेकर यांना असे म्हणायचे होते की निसर्गाच्या ऋतुचक्राचा फटका या स्थिर वर्गाला फार बसत नाही अगदी कोरोना काळात सुद्धा सरकारने कर्मचाऱ्यांना त्यांचे पगार दिले. दांडेकर यांना असे म्हणायचे होते की असा एक वर्ग असतो की ज्या वर्गाला सरकार पूर्ण संरक्षण देते त्या वर्गाच्या कुटुंबाची काळजी घेते इतकेच काय त्यांच्या मृत्यूनंतरही कुटुंबाची काळजी घेते त्याबद्दल तक्रार काहीच नाही. ते करायला हवेच पण ही संवेदनशीलता शेतकऱ्यांबद्दल कुठे जाते बरं ..?

शेतकऱ्यांसाठी ज्या ज्या विभागाने उपाययोजना केल्या पाहिजेत ते पण पाऊस सुरू असताना आणि पाऊस थांबल्यावर पण निवांत बसून असतात त्यांना सरकारी पगार आणि मलिदा खाताना लाज वाटत नाही का बरं....?

काल उभ्या पिकात नदी नाले ओढे यांचे पाणी घुसून प्रचंड नुकसान झाली आहे हे रोखता नक्कीच आले असते त्या नदी नाले ओढे यांची वेळीच दुरुस्ती वैगरे केली असती तर पण ते कोणी करावे कारण या देशात अशी व्यवस्था आहे. घटना घडल्यावर मलमपट्टी केली जाते. उभ्या सोयाबीन, बाजरी, तुर , भाजीपाला व कापसाच्या शेतात साठलेल्या पाण्यामध्ये पोहणारे तरुण बघितले ते हसत होते पण त्यांच्या हसण्या मागे दुःखाच्या वेदना पाहिल्या नाहीत कोणीचं. पुन्हा या अतिवृष्टीतून शेतकऱ्यांची सुटका नाही जी पिके वाचतीलच त्याला पण पुढे पाऊस येणारच आहे आणि त्यातूनही काही पिके व फळबागा वाचल्या तर पुन्हा मार्च एप्रिल मध्ये येणारा पाऊस किंवा कडक उन्हाळा त्यांनाही उध्वस्त करून टाकेल....

साधं आपले १० रुपये हरवलं तर दिवसभर चुटपुट लागते. पण डोळ्यासमोर आलेल्या पिकातून कर्ज फेडायचे किंवा डोळ्यासमोर आलेल्या पिकातून आपल्याला दारिद्र्यातून किमान एक पाऊल बाहेर निघता येईल अशी स्वप्न बघायची आणि क्षणात होत्याचे नव्हते झाले आहे तरीही कशी मन:स्थिती टिकवत असतील शेतकरी जरा विचारा आपल्या अंतःकरणाला महसूल , कृषी आणि जलसंधारण खात्यात मलिदा खातं बसलेल्यांनो ...?

खत आणि बियाणे उधारीवर घेतलेले असते त्या दुकानदारालाही शेतकरी सांगतात की पीक विकलं की तुझे पैसे देतो असे सांगणारे शेतकरी त्या दुकानावर आता काय घेऊन जातील ते सांगा बरं शासनकर्ती मंडळींनो मुला मुलींचे शिक्षण, लग्न, समोर ठेवलेली स्वप्नं क्षणात वाहून जाताना काय वाटत असेल ? आज राजकीय मंडळी कोणाचा तरी वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात व्यस्त आहेत पण मराठवाड्यातल्या खेड्यापाड्यातील रडणारा शेतकरी आठवत नाही. मान टाकलेला कापूस आणि बुडालेला सोयाबीन दिसत नाही यांना

राजवटी बदलल्या निजामाची राजवट जाऊन आम्ही आमचे सरकार आणले हे नक्कीच चांगले झाले पण शेतकऱ्याच्या गुलामगिरीचे काय ? शेतकऱ्याला आज जी अस्थिरता आहे त्या राजवटीतही होती आणि या राजवटीत आहे. कितीही नुकसान झाले तरी त्याला किमान जगण्याचा आधार देईल अशी व्यवस्था कधी निर्माण होईल...?

विलक्षण अस्वस्थता वाटते माझ्या शेतकरी बांधवांच्या समस्या पाहुन पण येथे राज्यकर्ती आणि शासनकर्ती मंडळी निवांत आहे हे निष्ठुर आहेत असेच म्हणावे लागेल.

पण दुर्दैवाने या दुःखालाही आता रिल्यस् सारखे अल्प आयुष्य आहे . काही दिवसात या बातम्या उरतील फक्त शेतकरी आणि संवेदनशील व्यक्ती यांच्या लक्षात पण सरकारी यंत्रणा विसरून जाईल हे सर्व या पुन्हा फुगतील आत्महत्यांचे आकडे .

◆ पान ९ वरून पुढे...

## वांगी येथे...

आपत्तीग्रस्तांना दिलासा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील , असे सांगितले . निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे वेळोवेळी नैसर्गिक आपत्तीचा आढावा घेऊन तात्काळ सूचना देत आहेत . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे व कोणतीही अडचण तातडीने कळवावी , असे आवाहन केले आहे .नैसर्गिक आपत्तीग्रस्त पंचनाम्यासाठी ग्रामस्तरावर त्रिस्तरीय समिती कार्यरत असते . या समितीत ग्राम महसूल अधिकारी , ग्रामपंचायत अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांचा समावेश असतो . समितीचा अहवाल तहसीलदारामार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जातो . जिल्हाधिकारी शासनाकडे निधीची मागणी करून तो निधी थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्याची प्रक्रिया राबवितात . जिल्ह्यातील पावसाची सद्यस्थिती पाहता , बीड जिल्ह्याचा सरासरी पाऊस जून ते सप्टेंबर कालावधीत ५६६.१ मिमी इतका असतो , मात्र यंदा १८ सप्टेंबरपर्यंत एकूण ६४१.६ मिमी पाऊस झाला असून तो सरासरीच्या ११३.३ टक्के आहे . मागील वर्षी याच काळात हा पाऊस ६९२.५ मिमी म्हणजेच १२२.३ टक्के झाला होता . तालुकानिहाय पाहता धारूर तालुक्यात सर्वाधिक ७८१.६ मिमी (११६.७ टक्के) , तर आष्टी तालुक्यात सर्वात कमी ४०३.६ मिमी (७३.९ टक्के) पाऊस झाला आहे . आंबाजोगाईत ७१६.४ मिमी (११३.३ टक्के) , मजलगावात ६९९.३ मिमी (११३.४ टक्के) , गेवराईत ६६१.२ मिमी (११२.६ टक्के) , शिरूर कासार येथे ६५६.५ मिमी (१२७.३ टक्के) , केज येथे ६२८.९ मिमी (१०७.८ टक्के) , पाटोदा येथे ६१५.६ मिमी (११४.३ टक्के) , वडवणी येथे ५३६.० मिमी (८९.२ टक्के) आणि परळी वैजापूर येथे ५५९.१ मिमी (८९ टक्के) पाऊस झाला आहे . बीड तालुक्यातील सर्कलनिहाय आकडेवारीनुसार १८ सप्टेंबरपर्यंत एकूण १९९.२ मिमी पाऊस झाला असून तो सरासरीच्या १०९.६ टक्के आहे . यंदा आतापर्यंत ७ पावसाळी दिवसांची नोंद झाली आहे . वांगी येथील पाहणी करतेवेळी सरपंच कमल वाघमारे ,मंडळ अधिकारी शीतल चाटे , ग्राममहसूल अधिकारी राधिका बहिर , ग्रामपंचायत अधिकारी श्री लोमटे , सहायक कृषी अधिकारी श्री रोहिटे यांच्यासह अच्युत शेळके , तुकाराम शेळके , गोरख शेळके , आत्माराम हाडूळे, सुरेश हाडूळे , अंगद हाडूळे ,श्रीहरी शेळके , प्रशांत शेळके , महादेव शेळके उपसरपंच दिनकर शेळके , दीपक शेळके , कल्याण शेळके , वैजनाथ कुलगुडे , मच्छिंद्र यादव , काशिनाथ यादव , रोहित राऊत,अशोक शेळके , प्रकाश हाडुळे , महेश शेळके , प्रभाकर कुलुगडे , शिवाजी कोलगुडे , दत्तू यादव , अशोक गोडसे , बाळासाहेब गोडसे , बाबासाहेब शेळके हे उपस्थित होते .

## मराठा समाजाला...

त्यांनी स्वत:ची वैयक्तिक रिट याचिका दाखल करावी, असे म्हणत मुंबई हायकोर्टाने ही याचिका फेटाळली.राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी काढलेल्या हैदराबाद गॅझेटच्या अध्यादेशामुळे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. मात्र, यामुळे ओबीसी आरक्षणावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे अध्यादेशावर आक्षेप घेत दोन जनहित याचिका मुंबई हायकोर्टात दाखल करण्यात आल्या आहेत. त्यापैकी वकील विनीत धोत्रे यांनी दाखल

◆ पान ९ वरून पुढे...

केलेल्या याचिकेवर आज सुनावणी पार पडली. हायकोर्टाने ही याचिका फेटाळून लावली आहे. हा मराठा समाजासाठी मोठा दिलासा समजला जात आहे.मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर आज सुनावणी पार पडली. आजची सुनावणी ही दोन सत्रांमध्ये झाली. सकाळच्या सत्रातील सुनावणीच्या सुरुवातीलाच ही याचिका जनहित याचिकेच्या कक्षेत बसते का? असा सवाल कोर्टाने केला. तर दुपारच्या सत्रात सुनावणीत सरकारच्या वतीने महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी बाजू मांडली.कोर्टाने म्हटले की, या जनहित याचिकेत 'व्यापक जनहित' दिसत नाही. तसेच, 'ज्या व्यक्तींना सरकारी निर्णयामुळे थेट बाधा झाली आहे, अशांनीच याचिका दाखल करणे अपेक्षित आहे.' याचिकेत कायद्यानुसार 'दुर्भावना' दिसून येत असली, तरी ती केवळ बाधित व्यक्तीच मांडू शकते, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.सरकारच्या वतीने महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी बाजू मांडली. शासन निर्णयाने कुठल्याही समाजातील लोकांचे नुकसान झालेले नाही. इतर कोणत्याही जातीच्या आरक्षणावर त्याचा परिणाम झालेला नाही, असे सांगितले.

## एन डी आर एफ...

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्याशी फोनवर संवाद करून या सर्व पूर परिस्थितीचा आढावा दिला. मग शासन स्तरावर मोठ्या वेगाने हालचाली झाल्या राज्याचे उपमुख्यमंत्री तथा मदत पुनर्वसन मंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी देखील संपर्क करून आमदार सुरेश धस यांनी अहिल्यानगर येथील आर्मी व एन डी आर एफ च्या टीम ने त्यांना हेलिकॉप्टर साह्याने पुरामध्ये अडकलेल्या लोकांना आपल्या हेलिकॉप्टरच्या द्वारे सुखरूप बाहेर काढण्यात यशस्वी झाले अशा भयानक परिस्थितीमध्ये शासन दरबारी व महाराष्ट्र सरकारकडे मोठ्या जलद गतीने पाठपुरावा केल्याने आर्मी एनडीआरएफ ची टीम व त्या टीम मधील आर्मीचे व इंडियाच्या जवानांनी मोठ्या हिमतीने अडकलेल्या जवळपास शेकडो लोकांचे प्राण वाचवण्याचे काम या आर्मीतील जवान व इंडिया मधील जवान यांनी काम केल्याने हेलिकॉप्टर च्या द्वारे ज्यावेळी या लोकांना आपल्यासमोर मृत्यू दिसत होता. त्या मृत्यूच्या गुहेतुन बाहेर काढून आपल्या कुटुंबात आणले त्यावेळी त्यांनी आमदार सुरेश आण्णा धस यांच्यापाशी आपली भावना व्यक्त करताना त्यांचे अश्रू अनावर झाले व ते म्हणाले अण्णा तुम्ही आमच्यासाठी खरंच देवदूत बनून आलात आमदार सुरेश अण्णांचे आर्मीच्या जवानांचे देखील त्यांनी हात जोडून आभार मानले. आष्टी तालुक्यामध्ये या झालेल्या अतिवृष्टीमुळे प्रचंड प्रमाणात शेतीचे शेत पिकाचे घरी पडली, कुणाचे शेत वाहून गेले ,तर कोणाच्या दुकानात पाणी शिरल्याने त्याचे लाखोचे नुकसान झाले शेतकरी शेतपिके वाहून गेल्याने हवानदील झाला आहे. अशा या परिस्थितीमध्ये तातडीने सर्व ठिकाणचे पंचनामे करण्याची उप जिल्हाधिकारी तहसीलदार यांच्या उपस्थितीत मॅरेथॉन बैठका घेऊन आमदार सुरेश धस यांनी सूचना करून लवकरात लवकर सर्व नुकसान ग्रस्तांचे पंचनामे करून जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करा अशा सूचना दिल्या आहेत

## बौद्ध महासभेचा ...

डॉ.बाबासाहे आंबेडकर पुतळ्यापासून सुरूवात करण्यात आली होती. या मोर्चामध्ये अनेक अनुयायांची उपस्थिती होती. मागणीचे निवेदन

◆ पान ९ वरून पुढे...

जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

## धोकादायक विद्युत...

अधिकार कार्यकर्ता महासंघ बीड जिल्हा डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी याविरोधात वारंवार निवेदने व आंदोलन केले तरी महावितरण व नगरपरिषद प्रशासन जबाबदारी झटकत आहेत. नुकत्याच झालेल्या मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यात प्रशासनाने रोहित्र झाकून ठेवून प्रश्न झाकण्याचा प्रयत्न केला मात्र नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे. नगरनाका ते कृषी कॉलनी हा अत्यंत महत्त्वाचा रस्ता असून येथे नाट्यगृह, दवाखाने, शाळा, शिकवण्या असल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. अशा गर्दीच्या मार्गावर रस्त्याच्या मधोमध उघडे रोहित्र व लोंबकळणाऱ्या तारांमुळे अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. या गंभीर प्रश्नाकडे पालकमंत्री अजितदादा पवार यांचे लक्ष वेधण्यासाठी सोमवारी (दि.२२) त्याच ठिकाणी सेल्फी विथ रोहित्र हॅशटॅग अजितदादा हे लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार असल्याचे डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले.

## शेतकऱ्यांनी एआय...

लिमिटेड सुंदरनगर आणि माजलगाव मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था मर्यादित यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य शेतकरी मेळाव्यात बोलत होते. सविस्तर वृत्त असे की, या मेळाव्यामध्ये शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे दरवाजे उघडण्याची संधी निर्माण झाली आहे. विशेषत: ऊसपिकासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची ओळख करून देऊन शेतकऱ्यांमध्ये नवीन तंत्रज्ञानाबद्दल कुतूहल जागवण्याचा उद्देश यशस्वी झाला आहे. मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या शेतकऱ्यांनी या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद दिला. या मेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट ऊस उत्पादन वाढविणे, पाण्याचा कार्यक्षम व योग्य वापर करणे आणि शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करणे असे होते. एआय शास्त्रज्ञ डॉ. समाधान सुरवसे, व्हीएसआय पुणे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या शेतीमधील अनुप्रयोगाबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यांनी स्पष्ट केले की, या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ऊसपिकावरील रोगराईचे निदान लवकर करता येते, योग्य खतांचे नियोजन करता येते आणि सिंचनाचे वेळापत्रक ठरवता येते. आजच्या काळातील आधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन शेतकऱ्यांनी कमी खर्चात जास्त उत्पादन कसे घ्यावे याचे व्यावहारिक मार्गदर्शन त्यांनी केले. शेतकऱ्यांनी त्यांचे व्याख्यान मोठ्या लक्षपूर्वक ऐकले आणि अनेक प्रश्न विचारले. डॉ. विवेक भोईटे, एआय शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र बारामती यांनी शेतकऱ्यांना मोबाइल अनुप्रयोग आणि संवेदक यंत्रणांच्या वापराबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी पाण्याच्या कार्यक्षम वापराची पद्धत शिकवली आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने पिकांची काळजी कशी घ्यावी याची व्यावहारिक माहिती दिली.

## मोठी बातमी! ...

शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी प्रकल्पासाठी दिलेल्या नाहीत. त्यामुळे या प्रकल्पाचे भूसंपादन अजूनही रखडलेलेच आहे. पण आता या प्रकल्पामध्ये बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना नवीन डेडलाईन देण्यात आली आहे. या डेडलाईनच्या कालावधीत जे शेतकरी आपली जमीन देणार नाहीत त्या शेतकऱ्यांची जमीन सक्तीने घेतली जाणार असल्याचे सांगितले जात आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

दिलेल्या तारखेपर्यंत जमीन संपादनासाठी संमती दिली नाही तर सक्तीने जमिनीचे संपादन केले जाणार आहे. या प्रकल्पासाठी आत्तापर्यंत २२०० शेतकऱ्यांनी संमती दाखवली आहे. या शेतकऱ्यांकडून २२५० एकर जमीन संपादित करण्यात आली आहे. पण अजूनही प्रकल्पासाठी ७५० एकर जमिनीची आवश्यकता आहे. महत्वाचे म्हणजे समती बाकी राहिलेल्या शेतकऱ्यांना फक्त दोन दिवसांची मुदत देण्यात आली आहे. या मुदतीत शेतकऱ्यांनी संमती दिली नाही तर त्यांची जमीन सक्तीने संपादित करण्यात येणार आहे. सक्तीच्या भूसंपादनात जमिनीच्या चारपट मोबदला देण्यात येईल पण यात शेतकऱ्यांचे नुकसान आहे. कारण त्यांना दहा टक्के अतिरिक्त मोबदला मिळणार नाही.

## अखेर पडला....

नावे हटवण्यात आली. सूर्यकांत नावाच्या व्यक्तीने १४ मिनिटांत १२ मतदार डिलीट करण्याचे अर्ज भरले, असे त्यांनी पुराव्यासह सादर केले. निवडणूक आयोगावर गंभीर आरोप: निवडणूक आयोग व्यवस्थितपणे लाखो मतदारांना लक्ष्य करून त्यांची नावे हटवत आहे, असा गंभीर आरोप राहूल यांनी केला. महाराष्ट्रातील राजूरा मतदारसंघातही हजारो मतदारांची नावे डिलीट झाल्याचा दावा त्यांनी केला. आम्ही पुराव्यांसह बोलत आहोत. दलित आणि ओबीसी समाज हा त्यांचा लक्ष्य आहे. मी माझ्या देशाच्या आणि संविधानाच्या रक्षणासाठी लढेन, असे त्यांनी ठामपणे सांगितले. राहूल गांधी यांनी निवडणूक आयोग आणि भाजपवर संगनमताचा आरोप केला. विपक्षाला मत देणाऱ्या समाजाच्या मतांचा छेद दिला जात आहे, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी व्हिडिओ आणि इतर पुरावे सादर करत आपले म्हणणे मांडले. पत्रकार परिषदेपूर्वीचा व्हिडिओ पत्रकार परिषदेपूर्वी काँग्रेसच्या अधिकृत पेजवर एक व्हिडिओ शेअर करण्यात आला होता. यात सिद्धू मूसेवाल्याच्या गाण्यासह कुर्सी की पेटी बांध लीजिए असा संदेश होता. यामुळे राहूल गांधी पुन्हा एकदा मत चोरीचा मुद्दा उपस्थित करतील, अशी चर्चा रंगली होती. यापूर्वी ७ ऑगस्ट रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी कर्नाटकातील एका लोकसभा मतदारसंघाच्या आकडेवारीचे विश्लेषण सादर करत मत चोरीचा आरोप केला होता.राहूल गांधी यांनी निवडणूक आयोगावर संविधानाविरुद्ध गुन्हा केल्याचा आरोप केला. निवडणूक आयोग भाजपसोबत मिळून मत चोरी करत आहे, असा थेट हल्ला त्यांनी चढवला.

## अनिलदादा जगताप...

जीवा वैद्य, जालिंदर जगताप, गणेश काळे, निलेश साळुंखे, शुभम सरडे व अशोक झगडे यांचा समावेश असून यावेळी विक्रम बिडवे यांची ओ.बी.सी-व्ही.जे.एन.टी सेनेच्या उपजिल्हाप्रमुख म्हणून निवड करून नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. शिवसेनेच्या विचारधारेवर विश्वास ठेवून व शिंदे साहेबांच्या जनतेसाठी असलेल्या प्रामाणिक कार्यपद्धतीतून प्रेरणा घेऊन झालेला हा जाहीर प्रवेश संघटनेच्या बळकटीसाठी तसेच समाज घटकांच्या प्रश्नांवर लढा देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला जिल्हा संघटक सुनील सुरवसे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व शिवसेना जिल्हा सहसमन्वयक दीपक काळे तसेच प्रतिक कांबळे यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

## मॉसाहेब मिनाताई...

तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है अशा गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी सांगितले की,आज सकाळी दादर येथील मिनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याचे लाल रंग टाकून केलेलय विटंबनेचा आम्ही तीव्र शब्दात निषेध नोंदवत आहोत,या घटनेने आमच्या डोळ्यात अश्रू व अंगार आले असून आम्ही व्यथित झालो आहोत कारण मिनाताई आम्हा तमाम शिवसैनिकांच्या मनात मायमाऊली असुन आमची अढळ श्रद्धा त्यांच्यावर आहे,या घटनेने महाराष्ट्र शासनाच्या कायदा व सुरक्षा व्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत,महान व्यक्तींनचे पुतळे सुरक्षित रहाते नसतील तर काय कायदा व सुरक्षा काम करत आहे, या राज्यात द्वेषभावनेचे राजकारण चालू असून ते बंद झाले पाहिजे, मिना ताईंच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्यांचा बंदोबस्त करुन जेरबंद न केल्यास शिवसैनिक महाराष्ट्र पेटविल्याशिवाय रहाणार नाहीत व बीड जिल्हातही त्याचा तीव्र परिणाम दिसून येईल असा इशारा यावेळी गणेश वरेकर यांनी दिला यावेळी युवा सेना बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले, तालुका सचिव नंदुभाऊ येवले, युवा नेते मुकेश भैय्या घुमरे,उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, तालुका सहसचिव संदिप भानप, दत्ता सुरवसे , ज्ञानेश्वर सिंघन, राजेंद्र भोसले,रामा जाधव, बाळासाहेब बेंगडे ,समाधान हिंगणे, गोरख सोनसळे, तुकाराम धोंडकर ,अमर बांड , महेश जाधव ,बारिकराव येवले,अकाश घोरपडे,बाबु कुटे,केशव नागरगोजे, विनोद वरेकर यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

## पंतप्रधान मोदींच्या...

शस्त्रक्रिया अल्पदरात व महात्मा फुले जनआरोग्य योजना / मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत मोफत उपलब्ध असतील. या शिबिरासाठी प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. रोहन धोत्रे (अहमदनगर) व त्यांचे सहकारी तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. इच्छुकांनी मो. ८२६२००९०९१ वर संपर्क साधावा. सर्व बीडकर व परिसरातील नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन भारतीय जनता पार्टी, बीड शहर यांच्या वतीने शहराध्यक्ष अशोक लोढा व शहर कार्यकारिणी यांनी केले आहे.

## शेतीशी निगडीत...

सार्वजनिक चर्चा झाली पाहिजे. यासाठीच आज शुक्रवार दिनांक

◆ पान ४ वरून पुढे...

१९ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता बोधेगाव येथे ग्राम विकास मंथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी, नामांकित उद्योजक तथा समाजसेवक रमण सर, डॉ.हरिश्चंद्र वंगे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार बाबुरव रूपणर यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सरपंच माऊली तात्या गडदे, उपसरपंच तसेच ग्रामस्थांनी केले आहे. गाव हा विकासाचा नकाशा, गावावरून देशाची परीक्षा, गावाची भंगत अवदशा, येईल देशा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील या ओळींप्रमाणे शेतकरी हा देशाचा कणा आहे. गाव सुधारले पाहिजे, शेतकरी सुधारला पाहिजे तरच राष्ट्राची उन्नती होईल. आज आपल्या भागातील शेतकऱ्यांच्या शेकडो समस्या आहेत, त्यावर मात्र कोणीही आवाज उठवत नाही. शेतकऱ्यांचा आवाज बुलंद झाला पाहिजे, त्यांच्या समस्या शासन दरबारी पोचल्या पाहिजेत. यादृष्टीने त्यांचा प्रतिनिधी म्हणून ग्लोबल विकास ट्रस्ट काम करायला तयार आहे. आत्तापर्यंत ३० हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांपर्यंत संस्था पोचली असून, विविध प्रकारचे लाभ त्यांना मिळवून दिले आहेत. आधुनिक शेती, शेतकऱ्यांच्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना करण्याच्या दृष्टीने जलनायक मयंक गांधी शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. बोधेगाव येथे आज शुक्रवार, दिनांक १९ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता ग्राम विकास मंथन कार्यक्रम होत असून, त्या कार्यक्रमास पंचक्रोशीतील सर्व गावांमधून जास्तीत जास्त संख्येने शेतकरी बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन बोधेगावचे सरपंच माऊली तात्या गडदे, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सहकारी सोसायटीचे संचालक तसेच ग्रामस्थांनी केले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## ॲड. जेबा...

रुग्णांशी उद्धटपणे वागतात, वेळेवर उपचार होत नाहीत आणि अनेक मूलभूत सुविधा दुर्लक्षित केल्या जात आहेत, अशी गंभीर तक्रार नोंदवली होती. या निवेदनाची गांभीर्याने दखल घेत, उपमुख्यमंत्र्यांनी आज जिल्हा रुग्णालयाच्या प्रशासनाला तत्काळ जाब विचारला. रुग्णांसोबत आदरपूर्वक वागणे, वेळेवर उपचार, तसेच आवश्यक सुविधा पुरवण्याच्या सूचना देत, कोणत्याही हलगर्जीपणाची पुनरावृत्ती झाल्यास कडक कारवाईचा इशारा त्यांनी दिला. या निर्णयामुळे सामान्य जनतेत समाधान व्यक्त होत असून, अखेर कोणी तरी रुग्णांच्या व्यथा ऐकल्या, अशी प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे. रुग्णालयातील सेवांमध्ये सकारात्मक बदल होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com



*बीड :मरठवाड मुक्तिसंग्राम दिनानिमित्त वरवटी/आहेर धानोरा ग्रुप ग्रामपंचायत ता.जि. बीड सरपंच मा.सौ.मोनिका बालासाहेब इंगोले यांनी ध्वजारोहण केला, यावेळी गावातील मार्गदर्शक ज्येष्ठ नागरिक,माता भगिनी, ग्रामपंचायत सदस्य,से.चेअरमन, सहकारी मित्र ग्रा.वि.अधिकारी ग्रा.प.कर्मचारी व जि.प. शाळेतील शिक्षक, शिक्षिका विद्यार्थी उपस्थित होते.*



*महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तसेच जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांनी सदिच्छा भेट. या प्रसंगी उपस्थित भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर भाऊ देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे, अशोक शेठ लोढा, जिल्हा बँकेचे अध्यक्ष आदित्यजी सारडा, नगरसेवक जगदीश भाऊ गुरुखुदे, सलीम भाई जहांगीर व मित्र परिवार.*

# डायलिसीस सुविधेचा लाभ गरजु रुग्णांनी घ्यावा : आ. विजयसिंह पंडित

## गेवराई उपजिल्हा रुग्णालयात आठ डायलिसिस मशिन कार्यान्वीत

**गेवराई । प्रतिनिधी**

किडणी विकार असलेल्या रुग्णांसाठी डायलिसिस सुविधा अतिशय महत्वाची आहे. डायलिसिस साठी लागणारा हजारो रुपयांचा खर्च आता वाचणार असुन महायुती सरकारने तालुकास्तरावर आशा वैद्यकीय सुविधा मोफत उपलब्ध करुन दिल्या आहेत. गेवराई उपजिल्हा रुग्णालयात आठ डायलिसिस मशिन आजपासुन कार्यरत होत असुन महाडायलिसिस सेंटर कार्यान्वीत होत असल्यामुळे गोर-गरीब किडणी रुग्णांना त्याचा लाभ होणार आहे. त्यामुळे डायलिसिस सुविधेचा लाभ गरजु रुग्णांनी घेण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले.



गेवराई उपजिल्हा रुग्णालयातील महाडायलिसिस सेंटर उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, अधिक्षक डॉ. सुरज कोठावळे, माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, माजी नगरसेवक शांतीलाल पिसाळ, राधेशाम येवले, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिपक आतकरे यांच्यासह मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य विभाग, एचएलएल लाईफ केअर लि. व उपजिल्हा रुग्णालय, गेवराई यांच्या माध्यमातुन किडणी विकार रुग्णांच्या मोफत डायलिसिस उपचारासाठी आठ डायलिसिस मशिनसह महाडायलिसिस सेंटर उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे सुरु करण्यात आले आहे. गुरुवार दि. १८ सप्टेंबर रोजी गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते महाडायलिसिस सेंटर चा शुभारंभ करण्यात आला. गेवराई डॉक्टरर्स असोसिएशनच्या वतीने अध्यक्ष डॉ. अशोक काळे व त्यांच्या संघटनेतील सहकार्यांनी गेवराई शहरात महाडायलिसिस सेंटर सुरु करुन गोर-गरीब रुग्णांना डायलिसिस सुविधा उपलब्ध करुन दिल्या बद्दल आ. विजयसिंह पंडित यांचा या कार्यक्रमात सत्कार करुन आभार व्यक्त केले. यावेळी डॉ. रांदड, डॉ. नोमानी, डॉ. शिंदे, डॉ. आंधळे, डॉ. शेख, मंगेश खरात यांच्यासह उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, नर्सगी स्टाफ व इतर कर्मचारी उपस्थित होते. उपजिल्हा रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. सुरज कोठावळे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

# व्यासंगी इतिहास संशोधकाला महाराष्ट्र मुकला

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ज्येष्ठ इतिहास संशोधक, शिवचरित्रकार गजानन मेहेंदळे यांना श्रद्धांजली

**मुंबई । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र ऐतिहासिक पुराव्यासह जगासमोर मांडणाऱ्या व्यासंगी इतिहास संशोधक, मार्गदर्शकाला महाराष्ट्र मुकला आहे. ही इतिहास संशोधन क्षेत्राची मोठी हानी आहे, अशा भावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ इतिहास संशोधक गजानन मेहेंदळे यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. व्यासंग आणि अभ्यासातून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्याविषयी अमुल्य अशी ग्रंथसंपदा निर्माण केली. त्यामुळे ते शिवचरित्रकार म्हणून अजरामर राहतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले आहे. शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, युद्ध पत्रकार ते भारत इतिहास संशोधन मंडळात प्रवेश आणि पुढे युद्धशास्त्राचा अभ्यासक, इतिहास संशोधक म्हणून मेहेंदळे यांचा जीवनप्रवास प्रेरणादायी असा राहिला. त्यांनी शिवकालीन इतिहास सप्रमाण मांडला. त्यांची संशोधन साधना, वैविध्यपूर्ण लेखन आणि सिद्ध झालेली ग्रंथसंपदा ही जगासाठी अमूल्य असा ठेवा आहे. त्यांचे शिवप्रेम ींसह, पुढच्या कित्येक पिढ्यांसाठी मौलिक कार्य आहे. शिवाजी महाराजांच्या चरित्राच्या सखोल अभ्यासासाठी ते मोडी लिपी बरोबरच फारसी, उर्दू, जर्मन, फ्रेंच, पोर्तुगीज अशा भाषा शिकले. संदर्भ मिळविण्यासाठी, अभ्यासकांशी चर्चेसाठी ते भारतभर फिरले.

# पंकजाताई मुंडे यांनी दिल्या शेतकऱ्यांच्या दुःखात सहभागी होण्यासाठी सर्व भाजप पदाधिकाऱ्यांना सूचना

## भाजप बीड जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे यांनी केली पीक नुकसानीची पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी शेतातील पिके वाहून गेली तर काही ठिकाणी पिके पूर्णपणे जमीनदोस्त झाली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर नामदार पंकजाताई मुंडे यांनी शेतकऱ्यांच्या दुःखात सहभागी होण्यासाठी भाजप बीड जिल्हा पदाधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. पंकजाताई यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले



की, शेतकऱ्यांच्या या संकटाच्या काळात आपण सर्वजण त्यांच्या सोबत खंबीरपणे उभे राहिले पाहिजे आणि त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी आवश्यक ती मदत केली पाहिजे.

याच सूचनेनुसार भाजप बीड जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे यांनी प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन शेतकऱ्यांच्या बांधावरून नुकसानीची पाहणी केली. त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व तातडीने शासनाकडून मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. अतिवृष्टीमुळे पीकहानी झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी भाजप पदाधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# गरजेच्या वेळी दुष्काळात तुम्ही पाणी नाकारलं ; आता पुर आल्यावर का सोडतात ? -ॲड.भाई राजेंद्र नवले

**बीड । प्रतिनिधी**



नाशिक विभागात सध्या पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने तेथून गोदावरी नदीचे पाणी मराठवाड्याकडे सोडलेले आहे. मात्र या सोडलेल्या पाण्याला शेतकरी कामगार पक्षाचे बीड तालुका चिटणीस तथा मध्यवर्ती सदस्य महाराष्ट्र ॲड. भाई राजेंद्र नवले यांनी स्पष्ट शब्दांत विरोध केला असून याबाबत जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन देखील देणार असल्याचे त्यांनी पत्रकात म्हटले आहे. ॲड. भाई नवले यांनी म्हटले आहे की, दुष्काळाच्या काळात जेव्हा मराठवाडा तहानलेला असतो, तेव्हा नाशिक विभागातील नेते गोदावरीचे पाणी देण्यास कायमच टाळाटाळ करतात. अनेकदा पाण्यासाठी न्यायालयाची पायरी चढावी लागते, आंदोलनं करावी लागतात, तरीही मराठवाड्याला पाणी दिलं जात नाही. आज मात्र नाशिकमध्ये पूरस्थिती निर्माण झाल्यानंतर, तेथील नेते मराठवाड्याला पाणी सोडलेले आहे .मात्र आम्हाला सध्या पाण्याची गरज नाही. जेव्हा गरज होती तेव्हा पाणी नाकारलं, आणि आता गरज नसताना सोडू म्हणतात, हे दुहेरी धोरण आम्ही मान्य करू शकत नाही, असं मत ॲड. भाई नवले यांनी मांडलं.

# बनसारोळा येथील स्वयंसेवी संस्थेला रासेयो स्वयंसेवकांची भेट

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी बनसारोळा येथील ग्रामीण विकास मंडळ या स्वयंसेवी संस्थेला भेट दिली. सामाजिक संस्थेचे कार्य कसे चालते ही प्रकिया समजावून घेताना रासेयो स्वयंसेवकांनी आपल्या मनातील विविध प्रश्न विचारून उत्तरे जाणून घेतली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना धारूर ग्रामीण रुग्णालयातील एड्स प्रतिबंधक कक्षाचे समुपदेशक श्री. प्रेमानंद स्वामी यांनी मार्गदर्शन केले. संस्थेच्या कार्यप्रणालीची माहिती



जाणून घेण्याविषयीचे स्वयंसेवकांना मार्गदर्शन आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे समन्वयक तथा कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. जाधव रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी केले. यामध्ये सहभागी झालेल्या स्वयंसेवकांचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, उप प्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे यांनी अभिनंदन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित उपक्रमांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

# जेष्ठ शिक्षक नेते उत्तमराव पवार यांना समाजभूषण पुरस्कार

**बीड । प्रतिनिधी**

जेष्ठ शिक्षक नेते तथा सामाजिक कार्यकर्ते व सरस्वती विद्यामंदिर शिवाजीनगर बीड चे संस्थापक सचिव सन्माननीय उत्तमराव पवार यांना अतिशय मानाचा समजला जाणारा इंदिराबाई गायकवाड चॅरिटेबल ट्रस्ट नवी मुंबई यांच्या वतीने दिला जाणारा समाजभूषण पुरस्कार जाहीर झाला असून सदरील पुरस्कार वितरण दिनांक-२० सप्टेंबर रोजी मुंबई येथे होणार आहे. इंदिराबाई गायकवाड चॅरिटेबल ट्रस्ट नवी मुंबई यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या या समाजभूषण पुरस्काराचे वितरण २० सप्टेंबर रोजी विष्णुदास भावे



नाटय़गृह वाशी नवी मुंबई येथे होणार असून सदरील पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रू.२१००० असे आहे. जेष्ठ शिक्षक नेते तथा सामाजिक कार्यकर्ते श्री.उत्तमराव पवार यांना या पुर्वी २००१मध्ये महाराष्ट्र शासनाचा अण्णाभाऊ साठे आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार, २०१९ मध्ये द.स्कूल एक्स्प्रेस चा शिक्षणमित्र पुरस्कार,२०२३ मध्ये संस्कार भारती बीड चा गुरूगौरव पुरस्कार तसेच २०२५ मध्ये समर्थ राजयोग या वर्तमान पत्राचा विवेकाचार्य राज्यस्तरीय सेवागौरव पुरस्कार आदि पुरस्कारांनी त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव केलेला आहे. जेष्ठ शिक्षक नेते व सामाजिक कार्यकर्ते तथा सरस्वती विद्यामंदिर शिवाजीनगर बीड चे संस्थापक सचिव उत्तमराव पवार यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सरस्वती विद्यामंदिर या संस्थेचे सर्व संचालक मंडळासह शाळेचे मुख्याध्यापक श्री.गोरे सर व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी वृंद पत्रकार प्रशालेचे पालक व विद्यार्थ्यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन करत पुरस्कार प्राप्तीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# महाराष्ट्र शासनाचे ११ वर्षे मुदतीचे 1,000 कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या ११ वर्षे मुदतीच्या १,००० कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. २३ सप्टेंबर , २०२५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २३ सप्टेंबर, २०२५ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत. यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल.

# सातत्याने समाजसेवा करणाऱ्यांची नोंद समाज ठेवतो : ॲड. अजित देशमुख

**धारूर । प्रतिनिधी**

हुतात्मा विचार मंच, किल्ले धारूर यांनी धारूर शहरातील प्रतिथयश सामाजिक कार्यकर्त्यांचा मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून सत्कार केला. अशा प्रकारची कौतुकाची थाप देणे, हे सध्या गरजेचे झाले आहे. हे काम उत्तम आहे, असे प्रतिपादन स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात ॲड. अजित देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, हुतात्मा पापासिंह दिखत आणि हुतात्मा काशिनाथ चिंचाळकर यांच्यासारख्यांनी मराठवाडा मुक्तीसाठी मोठे प्रयत्न केले. त्यांनी दिलेल्या बलिदानाचा वसा कायम रहावा या उद्देशाने धारूर येथील भूमिपुत्रांचा आज सन्मान करण्यात आला. या वेळी ज्यांना पुरस्कार मिळाला त्यांचे काम सातत्याने चालू आहे.




कोणत्याही कामातील सातत्य हेच कार्यकर्त्याला सन्मान मिळवून देत असते. या सर्व सत्कारमूर्तींनी आपापल्या क्षेत्रात प्रचंड मोठे काम केले आहे. त्यामुळे हा गुणगौरव तेवढाच महत्त्वाचा आहे. आज समाजात चांगले काम करणाऱ्यांना कौतुकाची थाप देण्यासाठी समाज पुढे येत नाही. मात्र अशा पुरस्काराच्या माध्यमातून सत्कार मूर्तींची जबाबदारी देखील वाढत असते. त्यामुळे सर्व सत्कारमूर्तींना ॲड. अजित देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोक चिद्रवार गुरुजी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. अजित देशमुख यांच्यासह लक्ष्मणराव चिंचाळकर हे देखील विचार मंचावर उपस्थित होते. प्राचार्य प्रदीप दुबे, अरुण दुबे, डॉक्टर अंबादास गुणाल, डॉक्टर एकनाथ शेळके, इंजि. संतोष दुबे, अभिनय कामाजी, संतोष शिरसाट, प्राचार्य विजयकुमार शिनगारे, इंजि. मनोज उकंडे आणि स्वरूप कंकाळ या मान्यवरांना यावेळी पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. नगरेश्वर मंदिर, किल्ले धारूरया सभागृहामध्ये हा कार्यक्रम मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पार पडला. यावेळी प्राध्यापक बाबुराव कुंभार, गोवर्धन मस्के, तुषार पाटील, संदिपान थोरात, बालाजी शितोळे, श्रीराम सिकची सर, शिवाजी पिलाजी, यांच्यासह शहरातील मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे सचिव ॲड.व्ही.बी.मगर, आणि आनंद छात्रालयामध्ये संस्थेचे अध्यक्ष बी.एस. धुतालमल यांच्या यांच्या शुभहस्ते आणि राम शिंदे व सर्व संचालक, माजी मुख्याध्यापक व्ही.जी.आवाड, आणि मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहन कार्यक्रमात उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांची प्रभात फेरी शालेय परिसरामध्ये काढण्यात आली. याप्रसंगी कु.आर्या गालफडे आणि संस्कृती साळवे या विद्यार्थिनींनी समायोजित वकृत्व केले. या कार्यक्रमास डी.व्ही. खरसाडे हे उपस्थित होते.

**जाहीर प्रगटन**

**मा. माणिकराव रा. सातव ७ वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १४३५/२०२५
संताप पि. सदाशिव गोळवलकर, विरुध्द निरंक

अर्जदार -१. संतोष पि. सदाशिव गोळवलकर, वय ६० वर्षे धंदा - नोकरी, रा. शांतीवन, एमलव्य कॉलेज जवळ, पुणे- ४११०३८, २. माधव पि. सदाशिव गोळवलकर, वय: ७० वर्षे, धंदा नोकरी, रा. प्लॉट नं. २३, माऊली नगर, दीघी कॅम्प, पुणे- ४११०१५

विरुध्द

गैरअर्जदार- निरंक

मागणी- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सदाशिव पि. रंगनाथराव गोळवलकर, रा. बीड, ता. जि. बीड यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी सदाशिव पि. रंगनाथराव गोळवलकर यांचा मृत्यु दि. ०४/०२/२०१९८९ रोजी पुणे, ता. जि. पुणे ये राहत्या घरी मयत झालेले असून मयताची पत्नी नामे निर्मला सदाशिव गोळवलकर हया दिनांक ०८/०५/२००४ रोजी मयता झालल्या असुन मयताचे आई वडील हे ब-याच वर्षापुर्वी मयता झालेले आहेत. अर्जदार १ ते २ हे मयताची मुले आहेत.

वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक सदरहू महिन्याचे आत त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत सदाशिव पि. रंगनाथराव गोळवलकर यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल यानी नोंद घ्यावी.

आज दिनांक १६ माहे सप्टेंबर सन २०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाने शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ३१ /१०/२०२५ आहे.

शिक्का
(स्वाक्षरीत) क. लिपीक
(स्वाक्षरीत) सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय, क.स्तर, बीड

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शुक्रवार, दि. १९ सप्टेंबर २०२५ • पान ४

## थोडक्यात...

### सुमित गाडे यास सुंदराबाई ओगले पारितोषीक प्रदान



**बीड । प्रतिनिधी**

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलित डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये विद्यालयातून सर्व प्रथम आल्याबद्दल सुंदराबाई ओगले स्मृती प्रित्यर्थ ५ हजार रुपये रोख, प्रमाणपत्र, शाल, पुष्पहार आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेचे अध्यक्ष बी.एस.धुतालमल, सचिव ॲड. व्ही.बी.मगर आणि मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांच्या शुभहस्ते तसेच सामाजिक कार्यकर्ते प्रा.वसंत विश्वनाथ ओगले आणि श्रीमती लता ओगले यांच्या सौजन्याने आणि अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी प्रा.वसंत ओगले आणि श्रीमती लता ओगले यांचे स्वागत विद्यालयामध्ये करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख, प्रास्ताविक संतोष मेश्राम आणि आभार प्रदर्शन डब्ल्यु.एस.वाघमारे यांनी केले. या प्रसंगी माजी मुख्याध्यापक व्ही.जी.आवाड, सर्व शिक्षक आर.बी.घुले, यु.बी.पवळ, श्रीमती एन.जी.मुंडे, शिक्षकेत्तर कर्मचारी एल.बी.हजारे, एस.एस.गायकवाड, भारत कोळेकर उपस्थित होते.

### माजलगाव तालुका प्रतिनिधी शेख हामीद दै.सूर्योदय च्या उत्कृष्ट प्रतिनिधी पुरस्काराने सन्मानित



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यात दैनिक सूर्योदय वृत्तपत्र हा शासकीय निम शासकीय कार्यालय व सामाजिक कार्यकर्ता संपर्क कार्यालय तसेच तालुक्यातील घराघरात जावे यासाठी तळमळीने प्रयत्न करणारे आणि कष्ट करणारे माजलगाव चे तालुका प्रतिनिधी शेख हमीद आज दै.सूर्योदयाच्या वर्धापन दिनानिमित्त उत्कृष्ट प्रतिनिधी म्हणून त्यांना पुरस्कार देण्यात आला व सन्मान करण्यात आला . माजलगाव तालुक्यात अनेक दैनिकाची रेलचेल आहे त्यातूनही दै.सूर्योदय दारा दारात कसे पोहोचले जाईल तळमळीने तन-मन-धनाने प्रयत्न करणारे माजलगाव तालुक्याचे सूर्योदयचे प्रतिनिधी शेख हमीद यांची दै. सूर्योदय कार्यालयाने दखल घेतली आणि आज दै.सूर्योदयचा वर्धापन दिनाच्या औचित्य साधून संघर्ष नायक मनोज दादा जरांगे पाटील, दै.सूर्योदयचे संपादक गंगाधर नाना काळकुटे,दै.सूर्योदयचे कार्यकारी संपादक दीपक काळकुटे यांच्या आणि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आज शेख हामीद यांना जिल्ह्यातील उत्कृष्ट तालुका प्रतिनिधी म्हणून पुरस्कार देण्यात आला व सन्मान करण्यात आला यावेळी परमेश्वर सोळंके, बाळासाहेब उफाडे, बाळासाहेब आडागळे, संतोष रासवे यांच्या बहुसंख्य माजलगाव तालुक्यातील पत्रकार व कार्यकर्ते उपस्थित होते शेख हमीद यांना उत्कृष्ट प्रतिनिधी म्हणून मिळालेल्या पुरस्काराबद्दल शेख हमीद यांचे माजलगाव तालुक्यातून सर्वत्र अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे व शुभेच्छा देण्यात येत आहेत.

### डॉक्टर्स, इंजिनीयर चा हृदयी सत्कार सोहळा थाटात संपन्न

**माजी सभापती सय्यद इलयास भाया यांचे आयोजन**



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील चार डॉक्टरांना आयुष महासन्मान पुरस्कार २०२५ मुंबईत मिळाल्याने तसेच जल अभियंता परीक्षेत विशेष प्राविण्याने यश मिळविणारे यांचा हृदयी सत्कार सोहळा बीड नगर परिषदेचे माजी सभापती सय्यद इलयास भाया यांनी गॅलेक्सी नेचरोपॅथी क्लिनिक खंदक येथे आयोजित केला होता. हा सत्कार सोहळा विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. वैद्यकीय क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर देण्यात येणारा आयुष महासन्मान २०२५ हा पुरस्कार डॉ. अब्दुल फ़ैज़ खान शेरखान, डॉ. टी.आर.काझी, डॉ. इमरान पठाण, डॉ. रईस सय्यद यांना नवी मुंबई येथे प्रदान करण्यात आला तसेच बीड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून शिक्षण घेत जल अभियंता परीक्षेत विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झालेले शेख लईक़ युसूफ़ यांचा सत्कार सोहळा बीड नगर परिषदेचे माजी सभापती सय्यद इलयास भाया यांनी आयोजित केला होता. या सत्कार सोहळ्यात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे, मुख्याध्यापक शेरखान पठाण, समाजसेवक मुसाखान पठाण, मुहम्मद अज़हरुद्दीन उर्फ़ ए.एस.गोलू, संपादक शेख ताहेर, धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते शेख वसीम व ज़ैद क़ादरी, मुहम्मद अब्दुल गफ़्फार, शेख फहीम आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांची प्रमुख उपस्थिती होती.

### प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात ओझोन दिन साजरा

**नेकनूर । प्रतिनिधी**

प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयामध्ये भूगोल विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ओझोन दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी.के. हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. विजय मस्के हे उपस्थित होते.



बीड मधील धांडे नगर भोसले नगर शिवपार्क कॉलनी धानोरा रोड आणि परिसरातील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. कारण या रोडचे बजेट संबंधित गुत्तेदाराने दुसरीकडे वळून सर्व बोगस काम दाखवत बजेट उचले गेले आहे. याची चौकशी करण्यासाठी परिसरातील नागरिक बीड नगर पालिकेने याची चौकशी करुन संबंधित गुत्तेदारांवर गुन्हा नोंद करावा अशी मागणी केली आहे.

## लिंबागणेश प्रा. आ. केंद्राची अवस्था बिकट

### ५ लक्ष रुपये खर्चूनही छत कोसळले



**● झालेल्या कामाची चौकशी व्हावी ग्रामस्थांची मागणी**

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रावर गतवर्षीच ५ लक्ष रुपयांचा निधी खर्च करून दुरुस्ती करण्यात आली होती. तरीदेखील इमारतीची अवस्था पूर्ववतच राहिल्याने अखेर दि. १५ सप्टेंबर रोजी झालेल्या मुसळधार पावसात आरोग्य केंद्राच्या छताचा भाग कोसळला.सुदैवाने कुठलीही जीवितहानी झाली नाही. गतवर्षीच जिल्हा वार्षिक निधी २०२३-२४ मधून आरोग्य केंद्राच्या इमारतीसह इतर कामांसाठी निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र, गुत्तेदाराने थातुरमातुर काम केल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे निधीचा अपव्यय झाला असून कामाची चौकशी करण्याची मागणी होत आहे. रक्षाबंधनाच्या दिवशी (१९ ऑगस्ट २०२४)च बाळंतीण सुनिता बोरखडे, रा. बोरखेड यांना पावसामुळे झालेल्या गळतीमुळे त्रास सहन करावा लागला होता. त्यावेळीच पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर तसेच सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानंतर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांनी रुग्णांना होणारी गैरसोय टाळण्यासाठी तत्काळ दुरुस्तीचे आदेश देऊन निधी बांधकाम विभागाकडे वर्ग केला होता. मात्र, दुरुस्तीच्या नावाखाली फक्त वरवरचे काम झाल्याचे आता स्पष्ट झाले आहे. छत कोसळल्यानंतर कर्मचाऱ्यांनी घटनेची माहिती फोटोसह संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ उल्हास गंडाळ यांना दिली आहे. ग्रामस्थांचा प्रश्न आहे की खरंच दुरुस्ती कुठे झाली ? कारण एका वर्षाच्या आतच नव्याने दुरुस्त केलेली इमारत जीर्णावस्थेत आली आहे. आरोग्य केंद्राची तात्काळ दुरुस्ती अथवा नवीन इमारत उभी केली नाही, तर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल.

### मॉसाहेब मिनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्या नराधमास अटक न केल्यास महाराष्ट्र पेटवू: जिल्हाप्रमुख गणेश वरेकर



**बीड । प्रतिनिधी**

मुंबई येथील शिवाजी पार्कच्या समोर असलेल्या तमाम शिवसैनिकांची मायमाऊली मिनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याची अज्ञात व्यक्तीने लाल रंग टाकून विटंबना केल्याने अखंड महाराष्ट्रातील शिवसैनिक दुखावले गेले आहेत,आज हि बातमी समजताच बीड जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन व तमाम शिवसैनिकांच्या उपस्थितीत सिद्धी विनायक कॉमलेकस जिजामाता चौक रोड येथे तीव्र आंदोलन करुन जाहीर निषेध करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज की जय,शिवसेना जिंदाबाद,मॉ. मिनाताई ठाकरे अमर रहे, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो, उद्धवसाहेब ठाकरे

▶▶ उर्वरित पान २ वर



*लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्था माजलगाव चेअरमन पदी श्री.विरेंद्रदादा सोळंके साहेब यांची निवड झाले बद्दल सत्कार करताना साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री आर.सी.बडगुजर साहेब समवेत श्री डी.एम.वरे जनरल मॅनेजर(आसवनी व उपपदार्थ), श्री रवि देशमुख मुख्य शेतकी अधिकारी, श्री सुरेश लगड सचिव, श्री भोसले ऊस पुरवठा अधिकारी*

### बीड नगर पालिकेचे माजी सभापती मोहम्मद इलियास उर्फ इलियास टेलर यांचा कॉंग्रेस प्रवेश



**बीड । प्रतिनिधी**

कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब व जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे यांच्या नेतृत्वात आज केज येथे बीड शहर नगर पालिकेचे माजी सभापती इलियास मोहम्मद शहा उर्फ इलियास टेलर यांच्यासह मुशर्रफ शेख, साद शेख, सोफियान इलियास शहा यांनी देखील कॉंग्रेस प्रवेश केला यावेळी जिल्हा उपाध्यक्ष प्रवीणकुमार शेप, बीड तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे, डॉ. चाळक आदी उपस्थित होते.

### पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये मोफत आरोग्य व अस्थिरोग तपासणी शिबिर

**पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते उद्घाटन : अशोक लोढा**

**बीड । प्रतिनिधी**

भारताचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त व सेवा पंधरवाडा निमित्त जैन सोशल फेडरेशन, अहमदनगर संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल, जालना रोड, बीड येथे रविवार दि. २१ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या वेळेत मोफत आरोग्य तपासणी व सर्व रोग निदान शिबिर, रक्तदान शिबिर तसेच अस्थिरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन लोकनेत्या मा. नामदार पंकजाताई मुंडे, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री यांच्या शुभहस्ते सकाळी १० वाजता होणार आहे. शिबिराचे प्रमुख आयोजक अशोक चांदमल लोढा, शहराध्यक्ष भाजप, बीड शहर आहेत. या शिबिरात डिजिटल एक्स-रे, सीबीसी रक्त तपासणी, शुगर तपासणी, नेत्र तपासणी, डायलेसिस मोफत, तसेच सोनोग्राफी व सीटी स्कॅन या तपासण्या अत्यल्प दरात करण्यात येतील. अस्थिरोग शिबिरात गुडघा, सांधे, पाठदुखी, कंबरदुखी तपासणी तसेच प्रत्यारोपण

▶▶ उर्वरित पान २ वर

## शेतीशी निगडीत विविध प्रश्नांवर मयंक गांधी यांचा शेतकऱ्यांशी संवाद

### बोधेगाव येथे आज ग्राम विकास मंथन कार्यक्रमाचे आयोजन



**परळी । प्रतिनिधी**

परळी तालुक्यात अतिवृष्टी होऊन शेकडो शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. नद्या, नाले, ओढे तुडुंब भरून वाहिल्याने काही पाणी प्रकल्प, बंधारे वाहून गेले आहेत. नुकसान झालेला शेतकरी खचला आहे, नैराश्याच्या गर्तेत जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यांच्यात नवी उमेद जागावी, शेतकऱ्यांना दिलासा मिळावा तसेच शेतकऱ्यांचे नेमके प्रश्न व त्यावरील उपाय यावर

**● जलनायक मयंक गांधी शेतकऱ्यांच्या बांधावर!**

**अतिवृष्टीने बाधित झालेल्या मलनाथपूर, परचुंडी, भिलेगाव, वाघाळा आदी गावांना गुरुवारी जलनायक मयंक गांधी यांनी भेटी दिल्या. नुकसान झालेल्या शेतांची पाहणी करून, नद्या व नाल्यांच्या अवस्थेचा एकंदर आढावा घेतला. शेकडो एकर शेती पाण्याखाली गेली असल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. झालेल्या आपत्तीची भरपाई होणार नाही, मात्र शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी त्यांना आधार देणे गरजेचे आहे. बाधित वरील सर्व गावांतून पापनाशी नदी जाते. ग्लोबल विकास ट्रस्टकडून येणाऱ्या काळात या नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करून देण्याचे आश्वासन जलनायक मयंक गांधी यांनी शेतकऱ्यांना दिले. झालेच तर ज्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे त्यांच्या शेतीचा वास्तविक सर्व्हे करून पुढील उपाययोजना करण्याचा मानस त्यांनी बोलून दाखवला.**

▶▶ उर्वरित पान २ वर

### ॲड. जेबा शेख यांच्या तक्रारीची तात्काळ दखल ; उपमुख्यमंत्री अजित पवारांचा जिल्हा रुग्णालयातील अधिकाऱ्यांना फटकारा



**बीड । प्रतिनिधी**

शाह अल्पसंख्यांक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा ॲड. जेबा कदीर शेख यांनी दिलेल्या निवेदनाची उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी तात्काळ दखल घेत जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकार्यांना चांगलाच धारेवर धरले. गोरगरीब रुग्णांच्या उपचारांमध्ये हलगर्जीपणा आणि अक्षम्य दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक शब्दांत नाराजी व्यक्त करत, पुन्हा अशी तक्रार कानावर येऊ नये, असा इशारा त्यांनी दिला. ॲड. जेबा शेख यांनी काल पालकमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन जिल्हा रुग्णालयातील अव्यवस्थेचा व कर्मचाऱ्यांच्या उदासीनतेचा मुद्दा उचलून धरला. त्यांनी सादर केलेल्या निवेदनात, रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी

▶▶ उर्वरित पान २ वर